दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 18 July 2025 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 232 ● Pages 4 ● Rate 4 Rs

**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

# विधानभवनाच्या लॉबीमध्ये हाणामारी : जितेंद्र आव्हाड-गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते भिडले

## राहुल नार्वेकरांनी मागितला अहवाल; विधानसभेत सदस्यांकडून तीव्र चिंता व्यक्त

**मुंबई (वृत्तसंस्था)–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड व सत्ताधारी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यातील वादाचे आज विधानभवन परिसरात तीव्र पडसाद उमटले. या दोन्ही नेत्यांचे समर्थक आज सायंकाळी थेट विधानभवनाच्या लॉबीत एकमेकांना भिडले. यावेळी त्यांच्यात तुंबळ हाणामारी झाली. या अचानक घडलेल्या प्रसंगामुळे विधिमंडळाच्या लॉबीत असणाऱ्या आमदारांत एकच घबराट पसरली. दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत घटनेचा अहवाल मागवला आहे. या घटनेमुळे विधानभवनातील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात विधिमंडळ परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे पाहून 'मंगळसूत्र चोर' अशी घोषणाबाजी केली होती. यामुळे पडळकर चांगलेच संतापले होते. या घटनेला ५ दिवस लोटत नाहीत तोच बुधवारी विधान भवनाच्या गेटवर या दोन्ही नेत्यांत चांगलीच बाचाबाची झाली. त्यानंतर आज पडळकरांच्या एका समर्थकाने आव्हाड यांना मारण्याची धमकी दिली. या घटनेचे आज विधानभवनाच्या लॉबीत तीव्र पडसाद उमटले. या दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते आज विधानभवनाच्या लॉबीत भिडले. त्यांच्यात कपडे फाटेपर्यंत जोरदार हाणामारी झाली. अचानक झालेल्या या प्रसंगामुळे तिथे उपस्थित असणारे आमदार व पत्रकारांत एकच खळबळ माजली. हे सर्वजण सुरक्षित ठिकाणी धावताना दिसून आले. या घटनेत आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना मारहाण झाल्याची माहिती आहे.**

दुसरीकडे, विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहांतील आमदारांनी या घटनेवर तीव्र चिंता व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आमदार रोहित पवार यांनी या घटनेची माहिती सभागृहाला देत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. राष्ट्रवादीच्या आमदार सना मलिक याविषयी विधानसभेत बोलताना म्हणाल्या की, ही संपूर्ण घटना मी माझ्या डोळ्यांनी पाहिली. एक महिला म्हणून आम्ही जेव्हा आत येतो, तेव्हा आसपास अनेक पुरुष असतात. त्यातच अशी एखादी घटना घडली तर सर्वच पुरुष एकाच दिशेने धावतात. त्या स्थितीत आम्हा महिलांना कोण संरक्षण प्रदान करेल? आमच्यासोबत आमचा केवळ एक पीए असतो. तो लोकांना आवाज देऊन बाजूला करतो. पण आज ज्या वेगाने लोक आतमध्ये घुसत होते ते भयंकर होते. हे पाहून मी सभागृहाला त्याची माहिती देण्यासाठी पुन्हा परत आले. सध्या विधिमंडळ परिसरात कोणतीही शिस्त दिसून येत नाही, असे त्या म्हणाल्या.



### गोपीचंद पडळकरांचे घटनेवर मौन

या प्रकरणी गोपीचंद पडळकर यांना छेडले असता त्यांनी आपला या घटनेशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. तसेच जितेंद्र आव्हाड यांना धमकी देणाऱ्या व्यक्तीला आपण ओळखत नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### हे लोक मलाच मारण्यासाठी आले होते -जितेंद्र आव्हाड

जितेंद्र आव्हाड यांनीही या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले, मी भाषण करून थोडी मोकळी हवा घेण्यासाठी सभागृहाबाहेर आलो होतो. तेव्हा हा प्रकार घडला. हे लोक मलाच मारण्यासाठी आले होते. हा हल्ला कुणी केला हे संपूर्ण महाराष्ट्राला समजले आहे. याहून मोठा पुरावा काय पाहिजे? तुम्ही विधानभवनात गुंडांना प्रवेश देणार असाल आणि ते हल्ले करणार असतील, तर आमचेच जीव सुरक्षित नाहीत. मी स्वत: ट्विट केले आहे. मला आई-बहिणीवरून शिवीगाळ करण्यात आली आहे. मारून टाकण्याची धमकी देण्यात आली आहे. कुत्रा, डुक्कर अजून बरेच काही लिहिले आहे. काय चालू आहे विधानसभेत?विधानसभेत विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आमदार सुरक्षित नसतील, तर कशाला राहायचे आमदार? काय गुन्हा आहे आमचा? कुणीतरी मवाल्यासारखा येतो आमच्या आई-बहिणींवर शिव्या देतो. त्याला ऑफिशिअल लँग्वेज म्हणून घोषित करा. असंसदीय शब्द वापरले जातात. त्यालाच आता संसदीय शब्द म्हणून घोषित करा. सत्तेचा एवढा माज, असा तीव्र संताप आव्हाड आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.

# उद्या वसंतराव काळे महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

## पोलीस अधीक्षक मा.नवनीत कांवत यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

आज स्पर्धेच्या आणि गतिमान युगात विद्यार्थ्यांना योग्य करिअर निवड करण्यासाठी व्यापक मार्गदर्शन व्हावे म्हणून आय टी क्षेत्रातील विविध करिअरच्या संधी या विषयावर पुणे येथील आयटी क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शनपर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



या संदर्भात अधिक माहिती अशी की, येथील वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालय बीड आणि संभाजी राजे ग्रंथालय व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयटी क्षेत्रातील विविध करिअरच्या संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे दिनांक: १९ जुलै २०२५ वार शनिवार सकाळी:१०:३० ते ०३:३० वा. या वेळेत आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १०:३० वा. बीड पोलीस अधीक्षक मा. श्री. नवनीतजी कांवत साहेब यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष मा. श्री. रमेश भाऊ पोकळे तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. श्रीकांतजी डिसले सहाय्यक पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा.श्री. तेजाजी शिंदे उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत पुणे येथील आयटी क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक मा. श्री. हिरेनजी केशरिया सीईओ वायर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड पुणे मा. श्री. गिरीषजी साळुंखे प्रकल्प व्यवस्थापक मा. श्र. निमीषजी हागे, मा. श्री. राहुलजी भालेराव, मा. श्री. गिरीशजी केळकर, मा. डॉ.श्री. रविंद्रजी खेडकर यांचे मोलाचे मार्गदर्शन होणार आहे.

या कार्यशाळेच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील करिअरचे मार्ग,अत्याधुनिक उद्योग ट्रेंड, अनुभवी व्यावसायिकांद्वारे वैयक्तिक करिअर समुपदेशन होणार आहे. तसेच या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअर निवड करण्यासाठी योग्य निर्णय क्षमता वाढण्यास देखील मार्गदर्शन होणार आहे. तेंव्हा विद्यार्थी- विद्यार्थिनींनी तसेच पालकांनी आणि आयटी क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान महाविद्यालय संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाटोदा पंचायत समितीची कोट्यवधींची नवीन इमारत धुळखात पडुन

## येणाऱ्या १५ ऑगस्टला तरी उद्घाटन होणार का?

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाच वर्षांपूर्वी बांधून पूर्ण झालेली पाटोदा पंचायत समितीची नवी इमारत अजूनही धुळखात पडून आहे. बीड जिल्ह्यातील बहुतेक पंचायत समित्या नव्या इमारतीत कार्यरत असताना, पाटोदा मात्र तांत्रिक कारणांची ढाल पुढे करत कोट्यवधी रुपयांची इमारत वापरात आणण्यात अपयशी ठरली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजन शून्यतेवर सवाल निर्माण होत आहेत.या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन अनेक वर्षे उलटली, परंतु अद्याप अधिकृत उद्घाटन झालेले नाही. दरवर्षी नवीन तारखा देऊन ही बाब पुढे ढकलली जात आहे. आता जनतेच्या मनात प्रश्न आहे – या येणाऱ्या १५ ऑगस्टला तरी या इमारतीचे उद्घाटन होणार का तालुक्यातील




नागरीक, ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी व स्थानिक नेते यांच्यातही या मुद्द्यावरून नाराजी वाढत आहे. पाटोदा तालुका विकासाच्या दृष्टीने मागे पडू नये यासाठी ही इमारत तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.एकीकडे जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील इतर पंचायत समित्यांच्या इमारतींचे लोकार्पण मोठ्या उत्साहात केले, तर दुसरीकडे पाटोद्याची इमारत मात्र पावसात ओलसर होत,गंजत व उन्हाळ्यात धूळ खात पडून आहे.या इमारतीच्या वापरा बाबत तांत्रिक अडचणी नेमक्या काय आहेत, त्यावर कोण उपाययोजना करणार, आणि येणाऱ्या १५ ऑगस्टला अखेर उद्घाटन होणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# नारायण गडाची बदनामी खपवून घेतली जाणार नाही–जिल्हाप्रमुख गणेश वरेकर



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लाखो भक्तांनचे श्रद्धास्थान असलेल्या धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगडाविषयी व गुरुवर्य शिवाजी महाराजविषयी काही विश्वस्त व काही लोक जाणीवपूर्वक बदनामी करत असुन गडाची बदनामी करण्याचा प्रयत्न करिता आहेत आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी नगद नारायण गडावर जाऊन शिवाजी महाराज यांची भेट घेतली व त्यांचा सत्कार करुन आशिर्वाद घेतले , यावेळी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी शिवाजी महाराज यांना सांगितले की ,बाबा नारायण गडाविषयी चाललेली बदनामी बघुन मी व्यथित झालो असुन आपल्या भेटीसाठी आलेलो आहे व कोण जाणीवपूर्वक बदनामी करत आहे व यामागे कोणाचा हात आहे हे मी लवकरच बाहेर काढणार आहे यापुढे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्ष आपल्या सेवेसाठी तत्पर राहिन असे अभिवचन देतो . बाबा आपल्या गडाच्या पाठीशी लाखो भाविक भक्त आहेत, बदनामी करणारे लवकर उघडे पडतील व भक्त त्यांना माफ करणार नाहीत असे वरेकर यांनी सांगितले. यावेळी समवेत अँड. योगेश शेळके ,जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, माजी सरपंच सखाराम तात्या मोहिते हे उपस्थित होते.

# केज–मांजरसुंबा रोडवर कोरेगाव जवळ टेम्पोतील ५० हजार रु.चे कांद्याचे बियाणे पळविले

**केज । गौतम बचुटे**

छत्रपती संभाजीनगर येथून लातूर जिल्ह्यातील मुरूडकडे कांद्याचे बियाणे घेऊन जात असलेल्या टेम्पोतील ५० हजाराचे बियाणे तिघा चोरट्यांनी कोरेगाव जवळ चालत्या वाहनातून पळविले आहे.या बाबतची माहिती अशी की, दि. १६ जुलै रोजी सिराज रज्जाक पटेल हा टेम्पो ड्रायव्हरने छत्रपती संभाजी नगर येथील एलोरा नॅचरल सीड्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपणीतून एलोरा वंडर (१०१) हे कांद्याचे वाणाचे बियाण्याचे १६० बॉक्स टेम्पो क्र. (एम एच ०४/एफ पी६८८७) मधून घेऊन लातूर जिल्ह्यातील मुरुडाकडे जात होता. रात्री त्याचा टेम्पो बीडच्या पुढे आल्याने रात्र झाली म्हणून त्यांनी एका पेट्रोल पंपावर वाहन थांबून मुक्काम केला.




त्या नंतर दुसऱ्या दिवशी दि. १७ जुलै रोजी सकाळी मुरुडकडे जात असताना सकाळी ७:०० वाजता टेम्पो मांजरसुंबा-केज रोडवरील कोरेगाव जवळून जात असताना त्यांना एका वाहन चालकाने टेम्पोतील माल चोरटे काढीत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

त्या नंतर टेम्पो ड्रायव्हर सिराज पटेल याने टेम्पो थांबून पाहिले असता तीन अज्ञात चोरटे हे टेम्पोमधून उड्या मारून शेतात पळून जात असताना पाठमोर पाहिले. ड्रायवर सिराज पटेल यांनी मालाची पाहणी केली असता ५९ हजार रु. किंमतीचे बियांचे ५ बॉक्स चोरीला गेले असल्याचे आढळून आले.

त्या नंतर सिराज पटेल यांनी ही माहिती केज पोलीस ठाण्यात दिली असता पोलिस उपनिरीक्षक सय्यद कराडकर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

सिराज पटेल यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ३८६/२०२५ भा. न्या. सं. ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल सानप हे करीत आहेत.

संपादकीय

## गोंधळी नको;विरोधक अभ्यासू हवेत...



राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला विधान भवनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ पाहायला मिळाला. काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नाना पटोले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आले; परंतु विरोधी पक्षाच्या एका सदस्यांवर कारवाई केली म्हणून विरोधकांनी संपूर्ण दिवसभरातील कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यामुळे गेले दोन दिवस जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवला गेला असे चित्र दिसले नाही.शेतकऱ्यांबद्दल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केले होते.या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे धाव घेतली आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलण्याचा प्रयत्न केला. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाल्याचे दिसले. अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. यावेळी सभागृहात जोरदार गदारोळ झाला. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी पटोले यांच्यावर एका दिवसासाठी कारवाई करण्याची घोषणा केली. यानंतर विरोधकांनी अधिक आक्रमक होत घोषणाबाजी केली. या सरकारचे करायचे काय? 'खाली डोकं वर पाय...' माफी मागा... माफी मागा शेतकऱ्यांची माफी मागा... अशी घोषणाबाजी करत सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर सर्व विरोधकांनी सभात्याग केला. आता पुढे काय? उद्याही असा एखादा मुद्दा घेऊन विरोधक गोंधळ घालू लागले तर, मूळ कामकाज कसे होणार, याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. पावसाळी अधिवेशन पंधरा दिवसांचे असते. या काळात पुन्हा सभागृहात गोंधळ झाला, तर जनतेचे प्रश्न मांडणार कधी असा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे.

लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने, एक अधिवेशन त्या ठिकाणी होते. अन्य दोन अधिवेशनेही राजधानी मुंबईत होतात. अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांला लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते. पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा अशी धडपड त्यात अनेकांची पाहायला मिळते; परंतु विधिमंडळाच्या आवारात केलेले आंदोलन हे रेकार्डवर नसते. ते दिवसभरातील एक प्रकारे मनोरंजन होते.विधानसभेचे २८८ आमदार आहेत. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदाराला आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याची संधी विधानसभेत मिळायला हवी असते; परंतु असे गोंधळ होत राहिले तर, आमदारांना जनतेच्या समस्यांवर प्रश्न विचारण्याची संधी कशी मिळेल? याचा अन्य सदस्यांनी विचार करायला हवा. आजचे उदाहरण घेऊ या... नाना पटोले यांनी अध्यक्षांच्या दालनांपर्यंत जाऊन गोंधळ घालण्याची खरंच गरज होती का? विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय विधेयक बहुमताने पारित करून केले जातात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीचा मान मोठा आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभा अध्यक्ष यांचा दर्जा हा सारखा असतो. त्यामुळे, नाना पटोले यांच्यासारख्या विधानसभा अध्यक्षपद आधी भूषविलेल्या लोकप्रतिनिधींनी पदाचा मान राखायला हवा होता. पटोले यांनी काँग्रेस पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षाची राज्याची धुराही सांभाळलेली आहे. तरीही त्यांचा संयम सुटला. पटोले यांच्यावरील कारवाईनंतर, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा जो निर्णय घेतला, त्यातून जनतेच्या प्रश्नांवर विरोधक संवेदनशील नाहीत, हे पुन्हा एकदा दिसून आले.'नेमेचि येतो पावसाळा' याप्रमाणे विधिमंडळ सचिवालयाकडून वर्षातून तीन अधिवेशने होत राहतील. या अधिवेशनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करावी लागते. तो पैसा जनतेच्या करातूनच खर्च केला जातो. त्यामुळे विरोधकांनी विधिमंडळाच्या कामकाजावर भर देत, जो जनतेचा आवाज आहे, तो सभागृहात मांडण्याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र विधानसभेची आजची स्थिती अशी आहे की, विरोधी पक्षाच्या आमदारांकडे पुरेसे आमदार नसल्याने विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागलेली नाही. आपले संख्याबळ कमी असताना, जास्तीत जास्त सभागृहात बाजू मांडणे हे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे आहे. सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदारांने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.

# भारतीय डॉक्टरांपुढील आव्हाने



आपल्या देशात कदाचित असे एकही कुटुंब नसेल, ज्यातील पालकांना आपल्या मुलांनी डॉक्टर किंवा इंजिनीअर व्हावे, अशी इच्छा नसेल; परंतु डॉक्टर होण्यासाठी लागणारी मेहनत, वेळ आणि डॉक्टर झाल्यानंतर आयुष्यभर पेलावी लागणारी आव्हाने यांचे गणित फारसे कोणी समजून घेत नाही. डॉक्टर होण्याआधीची आणि नंतरची आव्हाने थोडक्यात पाहू.

बारावी विज्ञान करणाऱ्या विद्यार्थ्यांना मेडिकलसाठी 'नीट', 'सीईटी' परीक्षा द्याव्या लागतात. यावर्षीच्या संदर्भात सांगायचे झाले, तर जवळपास २५ लाख मुलांनी 'नीट' परीक्षा दिली, त्यातून चाळून १२.७ लाख मुले 'नीट'पात्र झाली. भारतात जवळपास ७०६ वैद्यकीय महाविद्यालये आहेत. त्यातील शासकीय आणि खासगी, तसेच इतर प्रकारच्या वैद्यकीय महाविद्यालयांत केवळ एमबीबीएससाठी जागा आहेत सुमारे एक लाख दहा हजार. इतर जण दंतवैद्यक, आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी, तसेच फिजिओथेरपी यां सारख्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात. सामान्यतः शिक्षण व दोन वर्षांची अनिवार्य ग्रामीण आरोग्य सेवा अशी जवळपास आठ वर्षे झाल्यावर साधी पदवी मिळते. पण, फक्त पदवीवर दवाखाना चालवून उपजीविका भागवणे खूप कठीण जाते. म्हणून पदव्युत्तर, एमडी, फेलोशिप, डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेस आदींसाठी पुन्हा प्रवेश परीक्षेची तयारी असते. त्यासाठी एक-दोन वर्षे लागतात. असे शिक्षण घेता घेता एखादा विशेषज्ञ म्हणून बाहेर पडण्यासाठी सरासरी १३-१४ वर्षे जातात. त्यानंतर प्रचंड मोठ्या आरोग्यसेवा क्षेत्रात हे डॉक्टर पाऊल टाकतात.

सरकारी नोकऱ्या डॉक्टरांना मिळणे फारच कठीण. त्यामुळे खासगी प्रॅक्टिसचाच पर्याय उरतो. यात पाय रोवून स्वतःचे पोट भरण्यासाठी, जनरल प्रॅक्टिसपासून ते स्पेशालिस्ट ते आणखी पुढे काही वर्षे डोक्याचा भुगा करून शिकून पुढे सुपर स्पेशालिस्ट अशा गोंडस वाटणाऱ्या; पण प्रत्यक्षात आव्हानात्मक प्रॅक्टिससाठी एक एक डॉक्टर सज्ज होतो. या जनरल प्रॅक्टिसमध्ये एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस इ. पॅथीच्या डॉक्टरांचा अथांग सागर पसरलेला असतो. खरे तर अत्यंत कमी शुल्कात उत्तम मूलभूत आरोग्यसेवा देणारी ही फळी म्हणजे भारतीय आरोग्य यंत्रणेचा पाया म्हणावा लागेल; परंतु स्वतःच्या अस्तित्वाची मोठी स्पर्धात्मक आव्हाने यांच्यासमोर असतात. मात्र, त्याची जाणीवदेखील कोणाला नसते. उलट डॉक्टरांना त्यांची फी द्यायची म्हटले की पोटात कळ येते जणू. दारू, गुटखा, कपडे आदींवर अनावश्यक हजारो रुपये खर्च करतील; पण डॉक्टरांना पैसे देताना कपाळावर आठ्या पडतात अनेकांच्या.

स्पेशालिस्ट व सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांपुढील आव्हाने वेगळीच असतात. रुग्णालयासाठी लागणारी जागा, महागडी वैद्यकीय संसाधने, सोयी-सुविधा, देखभाल, कर्मचाऱ्यांचा पगार यासाठी प्रचंड भांडवल लागते. त्यासाठी कर्जाचा डोंगर डोईवर घ्यावा लागतो. या गोष्टीचीही फारशी कल्पना भारतातील अनेक लोकांना नसते. अशा ठिकाणी रुग्णांकडून अवाजवी शुल्क आकारले जाते, असा आरोप सर्रास होतो. काही ठिकाणी असे होते, यात दुमत नाही; परंतु इतका मोठा डोलारा सांभाळत, रुग्णांना सर्वोत्तम आरोग्यसेवेसोबतच आरामदायक सुविधा देण्यासाठी पैसा लागतोच. ' महात्मा फुले जन आरोग्य 'सारख्या वेगवेगळ्या शासकीय योजनांच्या अंतर्गत कित्येक खासगी रुग्णालये आरोग्यसेवा वाजवी दरात उपलब्ध करून देतात. अनेकदा कुठल्या योजनेत बसत नसतानाही कित्येक डॉक्टर रुग्णाची परिस्थिती पाहून हजारोंची बिले कमी करतात; तरीही डिस्चार्ज घेताना बिल कमी करण्यासाठी राजकीय दबाव, अरेरावी, रुग्णालयांमध्ये तोडफोड असे अनुचित प्रकार घडतात. हे सर्व प्रकार डॉक्टरांसाठी प्रचंड वेदनादायक आणि नैराश्य आणणारे असते. या नैराश्यातून काही डॉक्टरांच्या आत्महत्याही घडल्या आहेत.

काही डॉक्टरांच्या अत्यंत हव्यासी, आर्थिक फायद्याच्या आणि रुग्णांप्रति असंवेदनशील वर्तणुकीमुळे, तसेच काही गुन्हेगार डॉक्टरांमुळे वैद्यकीय क्षेत्र अधूनमधून बदनाम होते, हे मान्यच. त्याचे समर्थन मी आणि कुठलाही प्रामाणिक डॉक्टर कधीही करणार नाही; परंतु त्या मूठभर लोकांच्या वर्तणुकीचे खापर सरसकट सर्वच डॉक्टरांवर सतत फोडणे कितपत योग्य आहे? एक निष्णात डॉक्टर होण्यासाठी, आपल्या आयुष्याचा किमान दीड ते दोन दशकांचा कालावधी एखादी व्यक्ती देते. डॉक्टर एखादे औषध लिहून देतो त्यामागे त्या रुग्णाचे शरीर, व्याधी, कारणे औषधांचे प्रमाण अशा कितीतरी गोष्टींचा अभ्यास असतो.

'केवळ औषध लिहून देण्यासाठी पैसे का घेतात?' असा विचार करण्याआधी या मेहनतीचा विचार जरूर करावा. कित्येक निष्णात डॉक्टर विविध आरोग्य शिबिराअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया करतात. करोनासारखी स्थिती भारतीय डॉक्टरांनी किती सक्षमपणे हाताळली हे जगाने पाहिले; परंतु सामान्य नागरिक त्याची कितीशी दाखल घेतात? अनेक पाश्चिमात्य देशांतील आरोग्यसेवा भारताच्या मानाने फार महागड्या असल्याने कित्येक परदेशी रुग्ण कमी वेळेत व कमी खर्चात उत्तम उपचार घेण्यासाठी आपल्या देशात येत असतात. एक उदाहरण: हृदयाच्या बायपास शस्त्रक्रियेसाठी भारतात सरासरी पाच-सहा लाख रुपये खर्च होतो. त्याच शस्त्रक्रियेसाठी अमेरिकेत किमान एक कोटींच्यावर खर्च होतो.

आपल्याला मात्र आपल्याकडे असलेल्या बुद्धिमत्तेची कदर नसावी, हे दुर्दैव. शेवटी डॉक्टर कुठून परग्रहावरून आलेला नसतो. तोदेखील तुमच्यासारखा हाडामांसाचा माणूस असतो. ज्याला मन असते, भावना असतात आणि त्यालाही तुमच्याचसारखे एक कुटुंब असते. त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी असते. कित्येकदा रोजच्या कामामुळे डॉक्टरांना आपल्या कुटुंबासाठी वेळ काढणे दुरापास्त होते. कित्येकदा शासकीय किंवा खासगी डॉक्टर २४ ते ४८ तासांची सलग ड्यूटी करतात. तेही झोप, भूक, आराम अशा शारीरिक व मानसिक गरजा डावलून. परिणामी आपल्याकडे कित्येक डॉक्टर अत्यंत कमी वयात मधुमेह, रक्तदाब इ. व्याधींनी ग्रस्त होत आहेत. आपले कर्तव्य बजावताना कित्येक जण मृत्यू पावले आहेत.

भारतात सध्या जवळपास १३ लाख ८६ हजार नोंदणीकृत लोपॅथी आणि सात लाख ५२ हजार आयुष डॉक्टर आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या सांगण्यानुसार डॉक्टर-रुग्ण प्रमाण किमान १:१००० असायला हवे, जे आपल्याकडे १:८११ आहे. त्यात आवश्यक सोयी-सुविधा सर्वत्र उपलब्ध नसतात. यातून डॉक्टरांवरील कामाचा ताण वाढतो आहे. आरोग्य यंत्रणा चालवण्याची जबाबदारी शासन, प्रशासनापासून ते अगदी नागरिक अशी अनेकांची असते. रुग्णाच्या प्रकृतीबाबत एखादी दुर्दैवी घटना घडल्यास, हलगर्जी व कामचुकारपणा यंत्रणेच्या नेमक्या कुठल्या स्तरावर आहे, ते समजून घेऊन योग्य त्या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्याची वृत्ती आपण ठेवली पाहिजे. प्रत्येक वेळी डॉक्टरलाच दोषी धरणे योग्य नव्हे. वैद्यकीय क्षेत्र हे अत्यंत उदात्त आहे. त्यात मनापासून, जीव लावून काम करूनही, सामाजिक व राजकीय स्तरावरील सतत अवहेलना आणि अनपेक्षित वागणुकीने या क्षेत्रात तग धरणे डॉक्टरांसाठी अवघड होत चालले आहे. यातून त्यांच्यावरील मानसिक ताण वाढतो आहे.

डॉक्टरांना देव वगैरे म्हणू नका; पण किमान त्यांची मेहनत, त्यांच्यापुढील आव्हाने लक्षात घेऊन, किमान माणूस म्हणून तरी त्यांना समजून घेऊन त्यांच्याशी तसे वागायला हवे. आजच्या डॉक्टर्स दिनाच्या निमित्ताने इतकी अपेक्षा व्यक्त करणे अवाजवी ठरणार नाही.

# सरकार तोडगा काढेल?



गेल्या काही दिवसांत मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार अशा वेगवेगळ्या महापालिकांच्या परिसरातील बेकायदा निवासी बांधकामांचा प्रश्न वारंवार चर्चेत आला आहे. त्याचबरोबर अशा इमारतींमध्ये घरे खरेदी करून फसलेल्या हजारो ग्राहकांचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, घर ग्राहक भरडले जात असताना स्थानिक महापालिकेची रीतसर परवानगी न घेता तसेच सरकारी वा खासगी जमिनीवर बिनदिक्कत अतिक्रमण करून बेकायदा इमारती बांधणारे आणि मंजूर बांधकाम आराखड्याचे उल्लंघन करून अवैध बांधकाम करणारे खासगी विकासक नामानिराळे राहतात, हे अत्यंत विदारक वास्तव यानिमित्ताने प्रकर्षाने समोर आले. शिवाय मुळातच बेकायदा इमारती उभ्या राहत असताना त्याकडे जाणते-अजाणतेपणे दुर्लक्ष करणाऱ्या त्या-त्या महापालिकांच्या अधिकाऱ्यांचा 'निष्काळजीपणा' व 'संगनमत'ही नव्याने चर्चेत आले आहे.

आपल्या प्रभागात कुठेही अनधिकृत बांधकाम होत असल्यास त्यावर बारीक लक्ष ठेवण्याची आणि तत्परतेने कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक अधिकाऱ्यांची आहे, असे उच्च न्यायालयाने खूप पूर्वीच न्यायालयीन आदेशांत स्पष्ट केलेले आहे. त्यानंतर राज्यातील अनेक शहरांतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांची समस्या गंभीर होत असल्याचे लक्षात घेऊन राज्य सरकारने २ मार्च २००९ रोजीच्या जीआरद्वारे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना उपाययोजनांचे विविध निर्देशही दिले. त्यात अनधिकृत बांधकामांच्या निर्मूलनासाठी समर्पित यंत्रणा निर्माण करण्याच्या दृष्टीने निर्मूलन पथके, गुन्हे नोंदवून तपास पूर्ण करत आरोपपत्र दाखल करण्यासाठी स्वतंत्र विशेष पोलिस ठाणे, न्यायप्रविष्ट प्रकरणांचा निपटारा त्वरित होण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना, अशा उपायांचा समावेश आहे. मात्र, या उपायांची प्रभावी अंमलबजावणीच होत नसल्याचे पुरते स्पष्ट झाले आहे. 'सरकारच्याच जमिनींवर अतिक्रमण होते आणि तिथे बेकायदा बंगल्यांसह इमारतीही उभ्या राहतात. ती बांधकामे होत असताना महापालिका काहीच करत नाही. मग कारवाईविषयी न्यायालयाने विचारणा केल्यावर इमारतींमध्ये पाचशे लोक राहत असल्याची सबब महापालिका पुढे करते. प्रत्येक कायदा व नियम धाब्यावर बसवला जात असताना महापालिकेचे अधिकारी निव्वळ मूकदर्शक बनून राहतात. यापेक्षा कोडगेपणा व निर्लज्जपणा काय असू शकतो?', अशा कठोर शब्दांत उच्च न्यायालयाने गेल्या वर्षी खारेगाव येथील बेकायदा बांधकामांच्या प्रकरणात ठाणे महापालिकेचे वाभाडे काढले होते. अलीकडेच शिळ गावातील खासगी जमिनीवर अतिक्रमण करून बिनदिक्कतपणे तब्बल १७ बेकायदा इमारती उभ्या राहिल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केल्याबद्दलही न्यायालयाने ठाणे महापालिकेवर ताशेरे ओढले. 'अवैध बांधकामांमुळे शहराच्या नियोजनबद्ध विकासालाच फटका बसतो. शिवाय त्या अवैध बांधकामांसाठी शहरातील संसाधनांचा वापर होत असल्याने प्रामाणिकपणे कायदा पाळणाऱ्या व वैध इमारतींमध्येच राहणाऱ्या नागरिकांना गैरसोयी व अडचणींचा सामना करावा लागतो. अधिकारी कारवाई टाळत असल्यानेच अशी अवैध बांधकामे होतात', अशा शब्दांत मुंबई महापालिकेवरही न्यायालयाने दोन वर्षांपूर्वी ताशेरे ओढले होते. याशिवाय कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, वसई-विरार नवी मुंबई या शहरांतील महापालिकांच्या प्रशासनांनाही या प्रश्नावरून उच्च न्यायालयाच्या तीव्र नाराजीला वेळोवेळी सामोरे जावे लागले आहे.साधारण एक दशकापूर्वी नवी मुंबईतील दिघामधील जवळपास शंभर बेकायदा इमारतींच्या निमित्ताने हा प्रश्न प्रकर्षाने पुन्हा समोर आला होता. त्यामुळे राज्य सरकारने राज्यभरातील शहरी भागांतील ३१ डिसेंबर २०१५पर्यंतच्या बेकायदा बांधकामांना सशर्त संरक्षण देणारे धोरण दोनदा आणूनही उच्च न्यायालयाने ते घटनाबाह्य ठरवत फेटाळले. त्यानंतर सरकारने सन २०१७मध्ये एमआरटीपी कायद्यात दुरुस्ती करून कलम ५२-अ हे नवे कलम समाविष्ट केले. मात्र, 'मूळ बांधकाम हे कायद्याच्या कक्षेतील असेल तरच विशिष्ट अनधिकृत बांधकाम कायद्याच्या चौकटीत नियमित केले जाऊ शकते. जी बांधकामे मुळातच विकास नियंत्रण नियमावलीचे नियम धाब्यावर बसवून केलेली असतील त्यांना सरसकट नियमित केले जाऊ शकत नाही', असे स्पष्ट करत ते कलम उच्च न्यायालयाने अवैध ठरवले. त्याविरोधातील राज्य सरकारचे अपिल सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, बेकायदा व नियमांचे उल्लंघन करून होत असलेल्या बांधकामांची देशभरातील समस्या लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने राजेंद्र कुमार बडजात्या प्रकरणात १७ डिसेंबर २०२४ रोजी अत्यंत महत्त्वपूर्ण निवाडा दिला. त्यात अनेक निर्देश आहेत. 'न्यायालयांनी बेकायदा बांधकामांविषयी विनाकारण उदारता दाखवू नये आणि कठोर भूमिका घ्यावी', असेही त्यात म्हटले आहे. या निवाड्यानंतर अवैध व नियमबाह्य बांधकामांविषयीचे 'कायदेशीर' चित्र अधिकच स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील शहरांतील बेकायदा बांधकामांवर एकामागोमाग गाज पडत असल्याचे दिसत आहे. न्यायालयाच्या आदेशांमुळे त्या-त्या महापालिकांनीही कारवाईच्या हालचाली तीव्र केल्याचे दिसत आहे.

एकीकडे इमारत बेकायदा असल्याची जाणीव असूनही त्यातील घरे खरेदी करणारे; तर दुसरीकडे इमारत बेकायदा असल्याचे माहीत नसताना अजाणतेपणे घरे खरेदी करणारे, असे दोन गट महामुंबईत असल्याचे पहायला मिळत आहे. त्यातील पहिल्या गटाला कोणीच वाली नसल्याने हक्काचे छप्पर कारवाईनंतर हिरावले जात आहे. तर दुसऱ्या गटालाही इमारत बेकायदा असल्याच्या वस्तुस्थितीमुळे संरक्षण मिळेनासे झाले आहे. यातच कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीत 'रेरा नोंदणी'च्या अजब घोटाळ्याचे बळी ठरलेल्या ६५ इमारतींमधील कुटुंबांचा वेगळाच प्रश्न न्यायालयासमोर आला. घर ग्राहकांची फसवणूक टाळण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने आठ वर्षांपूर्वी रेरा कायदा आणला. त्याच कायद्यांतर्गत असलेल्या नोंदणीच्या आधारे, इमारत 'अधिकृत' असल्याची खातरजमा करून या लोकांनी घरे खरेदी केली. तरीही त्यांची फसवणूक झाली! कारण विकासकांनी महापालिकेच्या मंजुरीची बनावट कागदपत्रे तयार करून त्याआधारे 'रेरा' नोंदणी मिळवली होती.एका जनहित याचिकेच्या निमित्ताने हा घोटाळा उजेडात आल्यानंतर सरकारी प्रशासनांमध्येच समन्वय नसल्याचे विदारक वास्तवही समोर आले. मात्र, याचा मोठा फटका हक्काचा निवारा मिळवण्यासाठी, आपली लाखो रुपयांची कष्टाची कमाई लावणाऱ्या सर्वसामान्यांना बसला आहे. म्हणूनच अवैध कृत्ये करून नामानिराळे राहणारे 'लबाड' खासगी विकासक आणि त्यांच्याशी 'संगनमत' करणारे अधिकारी यांचा कायदेशीर 'पिच्छा' पुरवा आणि जमीन हातची जाऊ न देता त्यावर स्वत:च पुनर्विकास प्रकल्प राबवा, असा सल्ला देणे उच्च न्यायालयाला अलीकडेच भाग पडले. इतकेच नव्हे तर, बेकायदा इमारत उभी राहत असताना वेळीच कारवाई केली नसल्याची गंभीर दखल घेऊन अधिकाऱ्यांची न्यायिक व प्रशासकीय चौकशी लावण्याचे आदेश वेगवेगळ्या प्रकरणांत देणेही न्यायालयाला भाग पडले.बांधकामे नियोजनबद्ध व नियमाप्रमाणे व्हावीत यादृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना कायदा, मुंबई महापालिका कायदा, महाराष्ट्र महापालिका कायदा अशा कायद्यांतील तरतुदी आहेत. तरीही अनधिकृत बांधकामे करून नंतर ती नियमित करून घेण्याचे प्रयत्न सर्वत्र होत आहेत, असे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे 'बेकायदा बांधकामे करण्यासाठी जबाबदार असलेल्या सर्वच व्यक्तींना जरब बसेल, अशा कायदेशीर तरतुदी आणणे आवश्यक आहे. अशा प्रवृत्तींना खपवून घेता कामा नये. अन्यथा राज्यात नियोजनबद्ध विकास होणे, हे स्वप्नच राहील आणि एकप्रकारची अराजकता माजेल. त्यामुळे याप्रश्नी राज्य सरकारने कायदा करावा', असे गंभीर निरीक्षणही उच्च न्यायालयाने काही महिन्यांपूर्वी एका निवाड्यात नमूद केले. 'एकीकडे घर घेणे आवाक्यात नाही, तर दुसरीकडे परवडणारे घर घेतल्यास ते सुरक्षित राहण्याची शाश्वती नाही', अशी कोंडी महामुंबईतील लाखो लोकांची होत आहे. त्यामुळे कायदे आणि त्या कायद्यांचे रक्षण करण्यासाठी सरकारी प्रशासने असूनही विकासक व समाजकंटकांच्या पैशांच्या हव्यासाला 'चाप' लावून सर्वसामान्य ग्राहकांच्या हितरक्षणासाठी मायबाप सरकार काही करेल का? लाखो लोकांचे आयुष्य पणाला लागणाऱ्या या जिव्हाळ्याच्या समस्येवर काही तोडगा निघेल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# महाराष्ट्रातील दोन 'सेना' एकत्र:एकनाथ शिंदे यांना आनंदराज आंबेडकरांची साथ

## प्रबोधनकार ठाकरे यांच्या पासूनच शिवशक्ती-भीमशक्ती युती-आनंदराज आंबेडकर

**मुंबई (वृत्तसंस्था)-आनंदराज आंबेडकर यांचा रिपब्लिकन सेना पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना पक्ष यांच्या युतीची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून या युतीची चर्चा होती. आज एकनाथ शिंदे आणि आनंदराज आंबेडकर यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत आपल्या युतीची अधिकृत घोषणा केली. शिवशक्ती-भीमशक्ती एकत्र येत प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेण्याचा हा प्रयत्न असल्याचे या वेळी या दोन्ही नेत्यांनी सांगितले.लोकांच्या भल्यासाठी आम्ही एकत्र आलो असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे. आमच्यात एकमेकांबद्दल विश्वास असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. या महाराष्ट्रातील दोन सेना आहेत. शिवसेना आणि रिपब्लिकन सेना या दोन्ही रस्त्यावर अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सेना असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. यातील एक सेना बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणारी असून दुसरी सेना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचा वारसा घेऊन चालणारी सेना असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळेच आमच्यात एकदम चांगले जमेल, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी युतीची घोषणा केली आहे.**

या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऊउच् म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन अशा शब्दात आपल्या उपमुख्यमंत्री पदाचा उल्लेख केला. सर्वसामान्य माणसासोबत असलेली नाळ तुटू देता कामा नये, याचे पथ्य पाळण्याचे काम आजपर्यंत आम्ही केले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. आनंदराज आंबेडकर हे देखील बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचे वारस आहेत. बाबासाहेबांच्या घटनेमुळेच आज सर्वसामान्य माणूस सर्वोच्च पदावर पोहोचू शकला आहे. एकनाथ शिंदे देखील त्यांच्या संविधानामुळेच मुख्यमंत्री होऊ शकला असल्याचे ते म्हणाले.बाळासाहेब ठाकरे नेहमी आपल्या कार्यकर्त्याला सवंगडी समजा, असे सांगत होते. मात्र, काही लोक कार्यकर्त्याला घरगडी समजायला लागले होते, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला आहे. उद्धव ठाकरे यांच्या वतीने करण्यात येणाऱ्या आरोपांना देखील त्यांनी प्रत्युत्तर दिले. प्रत्येक आरोपाला मी उत्तर देत बसत नाही. मी बोलतो कमी आणि काम जास्त करतो. माझा



मुलगा ऑर्थो सर्जन आहे. मी डॉक्टर नसलो तरी छोटे-मोठे ऑपरेशन करत असल्याचे ते म्हणाले. मी परत त्या इतिहासात जाऊ इच्छित नाही. आपल्याला भविष्याकडे जायचे असल्याचे, त्यांनी म्हटले आहे. सध्या मोठ्या ऑपरेशनची गरज नाही. काही गोळ्या-औषधी देऊनही काम होत असल्याचेही ते म्हणाले.

बाबासाहेबांचे संविधान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श हे सर्व डोळ्यासमोर ठेवूनच आपण काम करत असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. आपले संविधान जगात सर्वोत्तम राहिले पाहिजे, असा प्रयत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी केला आहे. आनंदराज आंबेडकर हे देखील सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून काम करत आहेत. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असे सूत्र आनंदराज आंबेडकर यांनी पाळले आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांना संधी मिळाली पाहिजे, या भूमिकेतून ते काम करत असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. कार्यकर्त्यांच्या मागे नेत्यांनी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे देखील एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

बाबासाहेब आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्या पासूनच शिवशक्ती-भीमशक्ती युती सुरू झाली होती. तीच ही युती असल्याचे रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांनी व्यक्त केले आहे. एकनाथ शिंदे यांचा मी कार्यकर्ता म्हणून उल्लेख करत असतो. कारण मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत देखील ते मुख्यमंत्री म्हणून वागले नाही तर कार्यकर्ता म्हणून त्यांनी कायम सामन्य माणसाच्या सुखदुःखाशी एकरूप होण्याचा प्रयत्न केला. असे म्हणत आनंदराज आंबेडकर यांनी एकनाथ शिंदे यांच्या कामाचे कौतुक त्यांनी केले आहे.

---

### पत्रकारांसाठी रविवारी एक दिवसीय कार्यशाळा

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळा रविवार, २० जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात होणार आहे.

मूळ वर्धा जिल्ह्यातील व सध्या परभणीमध्ये जिजाऊ ज्ञानतीर्थ महाविद्यालयात शिक्षक असलेले दीपक रंगारी 'वृत्तसंकलन-संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व', माध्यम तज्ज्ञ आणि पत्रकारितेची पायवाट आणि संरक्षण पत्रकारिता या ग्रंथांचे लेखक प्रा. शिवशंकर पटवारी 'कृत्रिम बुद्धीमत्ता आणि पत्रकारिता' या विषयावर तर 'समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये' यावर छत्रपती संभाजी नगर येथील माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे मार्गदर्शन करणार आहेत.

अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी आदी पत्रकारांसाठी असलेल्या योजनांबाबत प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके माहिती देणार आहेत. या कार्यशाळेत सर्व पत्रकार बांधवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाकडून करण्यात आलेआहे.

---

## येळी फाटा येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आमदार धनंजय मुंडे यांचा वाढदिवस साजरा

### रक्तदान शिबिर व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**हिंगोली । प्रतिनिधी**

सविस्तर वृत्त असे की राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परळी विधानसभेचे आमदार धनंजयजी मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान व रक्त तपासणी शिबिर तसेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी १५ जुलै रोजी औंढा तालुक्यातील येळी फाटा येथे करण्यात आले होते या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडीदादा बांगर उमाकांत भैया नवघरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिंतूर तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमात शुभेच्छा दिल्या त्यानंतर मोठ्या प्रमाणावर उत्साह पूर्वक ५७ रक्तदात्यांनी रक्तदान केले तसेच वृक्षारोपण करण्यात आले अशा पद्धतीने उत्साह पूर्वक वाढदिवसाच्या कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या थाटामाटात पार पडला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष मा.बि.डी दादा बांगर, उमाकांत भैया नवघरे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिंतूर तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे औंढा तालुकाध्यक्ष तथा जि.प सदस्य संजय दराडे, राष्ट्रवादी ओबीसी सेल चे जिल्हाध्यक्ष विक्की देशमुख,माजी पं.स सदस्य गजानन सांगळे,भगवान इघारे,जयराम कुटे, पांडुरंग कुटे, सुभाष कावरे,शेषराव भाई, ऋषिकेश सानप,सांगळे, रामप्रसाद आघाव,राजू नागरे,पप्पू वैद्य,भैया गायकवाड,योगेश देशमुख, विशाल जायभाये,माऊली कागणे, भास्कर आघाव,निवास दराडे,महादू दराडे, हनुमान गीते, मंगेश कुटे,कैलास सांगळे पांडुरंग सांगळे विक्रम सांगळे,नागनाथ सांगळे,सारंग नागरे अमोल गीते इत्यादी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन विलास दादाराव आघाव,जगन्नाथ सांगळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व लोकनेते धनंजय मुंडे प्रतिष्ठान यांनी केले होते.

---

## असंघटित कामगार व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने व ताकदीने संघर्ष करावा-खा.वर्षा गायकवाड

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई प्रदेश असंघटित कामगार व कर्मचारी काँग्रेस मुंबई ( के के सी) चा मेळावा मुंबई काँग्रेस च्या सभागृहात संपन्न झाला.या प्रसंगी असंघटित कामगारांना त्यांच्या प्रश्नांवर एकजुटीने व ताकदी ने संघर्ष करण्याचे आवाहन मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा व खासदार वर्षा गायकवाड यांनी केले .मार्गदर्शनपर भाषणामध्ये त्यांनी सांगितले की काँग्रेस पक्षाच्या झेंड्याखाली फेरीवाले, घरेलू कामगार, छोट्या उद्योगांमध्ये काम करणारे कामगार, तसेच ओला, उबेर, झोमॅटो, मेझॉन या प्लॅटफॉर्मवर काम करणारी कामगार यांच्या मागण्यासाठी संघटित होणे गरजेचे आहे. कामगार कायद्याचे उल्लंघन केले जाते, न्याय मागणाऱ्या कामगारांना राज्य सरकार न्याय देत नाही, नुसते खोटे आश्वासन देत आहे.

त्यांनी येणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये कामगारांनी काँग्रेस पक्षाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के के सी च्या अध्यक्षा नीता महाडिक होत्या. त्यांनी मुंबई महानगरपालिके अंतर्गत असणाऱ्या कामा हॉस्पिटल मधील कंत्राटी कामगारांची



व्यथा मांडली. येथील कामगारांना गेल्या तीन महिन्यापासून वेतन देण्यात आले नाहीत, त्यांचा प्रॉव्हिडंट फंड भरला जात नाही व कामगारांना कामावर येऊ नये असे सांगण्यात येत आहे असे त्या म्हणाल्या.

इंटक कामगार नेते, केकेसी चे वरिष्ठ उपाध्यक्ष व मुंबई काँग्रेसचे सेक्रेटरी अनिल गणाचार्य म्हणाले की मुंबई व महाराष्ट्र राज्य मध्ये कामगार कायदे धाब्यावर बसविले जात आहेत. नवीन चार कायदे संमत करण्यात आले आहे. जे कामगारांविरुद्ध आहे व मालकांना फायदेशीर आहेत. असंघटित कामगारांना केव्हाही बेकायदेशीरपणे कामावरून काढण्यात येते, फेरीवाल्यांना परवाना असताना देखील महापालिका व पोलीस खात्याकडून त्रास दिला जातो.

असंघटित कामगारांना एकजूट करून काँग्रेस पक्षाच्या झेंड्याखाली आणून केकेसीच्या संघटना मजबूत करण्याचे त्यांनी आवाहन केले.

अजंता यादव माजी नगरसेविका व माजी मुंबई महिला अध्यक्षा यांनी मार्गदर्शन करते वेळेस महागाईचे प्रश्न मांडले व सत्ताधारी पक्ष समाजामध्ये दुफळी करण्यात दंग असून गरीब व सर्वसाधारण जनतेकडे दुर्लक्ष करीत असल्याचा त्या म्हणाल्या.सभेचे प्रास्ताविक भाषण अनुराधा काशीकर, सरचिटणीस यांनी केले. के.के.सी.चे मुंबई कार्याध्यक्ष आदर्श निकाळजे, राकेश पावसकर, दक्षिण मुंबईचे अध्यक्ष सलीम खान यांनी सभा यशस्वी करण्यासाठी मोलाची साथ दिली. सभेमध्ये माजी नगरसेवक बब्बू खान व इतर पदाधिकारी देखील उपस्थित होते .सदर कार्यक्रम मुरली देवरा हॉल, मुंबई काँग्रेस कार्यालय, आझाद मैदान, सीएसटी येथे आयोजित करण्यात आला होता.

---

## बेकायदेशीर बाईक टॅक्सीमार्फत अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई



**नवी मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महानगरात काही प्रवासी अवैध मार्गाने बाईक टॅक्सीच्या माध्यमातून प्रवास करत असल्याचे निदर्शनास आले आहे, तशा परिवहन विभागाकडे तक्रारी देखील प्राप्त झाल्या आहेत . त्या अनुषंगाने तातडीने तपास सुरू करण्यात आला. यामध्ये काही अप्रमाणित प्स व बेकायदेशीर बाईक टॅक्सी चालकांकडून शासनाच्या कोणत्याही परवानगीशिवाय प्रवासी वाहतूक केली जात असल्याचे समोर आले आहे. यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान तर होतेच, शिवाय प्रवाशांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होतो.

मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ९३ नुसार, कोणत्याही प्रवासी वाहतूक सेवेच्या संचालनासाठी आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, काही प कंपन्या व चालक हे नियम धाब्यावर बसवत बेकायदेशीर वाहतूक करत असल्याचे उघड झाले आहे.या पार्श्वभूमीवर, क्षेत्रीय परिवहन कार्यालय (ठढज), मुंबईच्या विशेष पथकांनी २० युनिट्समार्फत एकाच वेळी मुंबई, ठाणे, वसई, वाशी, पनवेल येथे संयुक्त कारवाई मोहीम राबवली. सदर मोहिमेमध्ये एकूण १२३ बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यातील ७८ बाईक टॅक्सी जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच, संबंधित चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून अवैध प ऑपरेटरविरोधातही पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

---

## शाळा व्यवस्थापन समिती सक्षमीकरण कार्यशाळा उत्साहात संपन्न;गट शिक्षणाधिकारी समंदर खान यांचे मोलाचे मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

समग्र शिक्षण अभियानांतर्गत बीड तालुक्यातील शाळा व्यवस्थापन समिती (डचउ/डचऊउ) सदस्यांसाठी सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दिनांक १७ जुलै २०२५ रोजी सकाळी १०:३० ते १:०० व दुपारी १:३० ते ५:३० या वेळेत सर सय्यद शाळा, झमझम कॉलनी, बीड येथे ही कार्यशाळा दोन सत्रांत पार पडली. या कार्यशाळेला बीड तालुक्यातील जिल्हा परिषद व खाजगी शाळांमधील डचउ/डचऊउ चे अध्यक्ष, मुख्याध्यापक अर्थात समितीचे पद सिद्ध सचिव, सदस्य व संबंधित शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यशाळेचे उद्दिष्ट समिती सदस्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या, कार्यपद्धती व उद्दिष्टांविषयी सखोल माहिती देणे, शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचा सक्रिय सहभाग वाढवणे हे होते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शाळा व्यवस्थापन समित्यांचा अधिक प्रभावी सहभाग सुनिश्चित करण्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरेल.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून गट शिक्षणाधिकारी श्री. समंदर खान यांनी उपस्थितांना सविस्तर व प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी समितीच्या कार्यशैलीवर भर देत शाळा विकास आराखडा (डउझ), बालकांचा शैक्षणिक हक्क कायदा (ठढए), पारदर्शक निधी व्यवस्थापन, पालक-संवाद यासारख्या मूलभूत विषयांवर माहिती दिली. तसेच वृक्षारोपण, शालेय पोषण आहाराचा प्रभावी अंमल, बालविवाह प्रतिबंध, यू-डायस प्लस प्रणालीतील




ड्रॉप बॉक्स नोंदणी, रजेचे परिपूर्ण अर्ज, वार्षिक नियोजन, विद्यार्थ्यांचे संरक्षण, तक्रार निवारण यंत्रणा आदी मुद्द्यांवर मार्गदर्शन करत त्यांनी डचउ/डचऊउ सदस्यांची भूमिका किती महत्वाची आहे, हे अधोरेखित केले.कार्यक्रमात साधन व्यक्ती श्री. मोमीन इसाक यांनीही सहभागी सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षक यांना विविध उपयुक्त विषयांवर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या विचारमंचावर ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. सिद्धेश्वर माटे व श्रीमती गंगाखेडकर मॅडम यांचीही उपस्थिती होती.तालुक्यातील जिल्हा परिषद, खाजगी संस्थासह विविध प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून आलेले समिती अध्यक्ष,सदस्य, शिक्षक व मुख्याध्यापक यांनी कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला. उपस्थित सदस्यांनी कार्यशाळेतील मार्गदर्शनाला सकारात्मक प्रतिसाद देत, पुढील काळात समितीच्या माध्यमातून शाळा विकासासाठी सक्रिय योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गट शिक्षण कार्यालय, बीड यांचे सहकार्य लाभले. तांत्रिक सहाय्यक शिक्षक, कर्मचाऱ्यांचा समन्वय, नियोजन आणि कार्यवाहीमुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

# ज्ञानेश्वरी मुंडेंची खा.सोनवणेंनी घेतली भेट

# भाऊ म्हणून पाठीशी राहण्याचा शब्द

## जिल्हा रूग्णालयात सुरू आहेत उपचार; योग्य उपचार करण्याचे डॉक्टरांना सुचना

**बीड । प्रतिनिधी**

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी (दि.१६) सकाळी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाबाहेर कुटुंबासह आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यांच्यावर जिल्हा रूग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून दि.१७ जुलै रोजी सायंकाळी खा.बजरंग सोनवणे यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी तुमचा भाऊ म्हणून मी पाठीशी असून तूम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी मी लढा देईल, असा शब्दही खा.सोनवणे यांनी दिला.परळी येथील व्यापारी मुंडे यांचा ऑक्टोबर २०२३ मध्ये निर्घृण खून झाला होता. या घटनेला आता अठरा महिन्यांहून अधिकचा काळ लोटला आहे पण या प्रकरणी अद्याप कुणालाही अटक झाली नाही. तपासाला विलंब होत असल्याने ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी सकाळी कुटुंबासह बीड पोलीस अधीक्षक कार्यालयापुढे अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी पोलीसांनी रोखले परंतु त्यानंतर त्या गाडीत बसण्यासाठी गेल्या परंतु त्यांनी फ्रुटीच्या बाटलीत असलेले कोणते तरी विषारी द्रव केले आणि त्या जमिनीवर कोसळल्या. यानंतर पोलिसांनी तातडीने त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेले आहे. दि.१७ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबईहून परतले. त्यांनी केजला न जाता आधी जिल्हा रूग्णालयात धाव घेतली. उपचार सुरू असलेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांची त्यांनी भेट घेत अस्तेवाईकपणे चौकशी केली. ताई, तूम्ही आत्महत्या करण्याचा विचार करण्याआधी लेकरांच्या तोंडाकडे बघायचे होते. या लेकरांसाठी खंबिर व्हा, तूम्हाला न्याय देण्यात हे सरकार कमी पडत आहे. परंतु तूमच्या लढाईत मी स्वत: तुमचा भाऊ म्हणून तुमच्या पाठिशी आहे, या लढाईत मी तुमच्या सोबत खांद्याला खांदा लावून लढेल, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.



माझ कुटूंबच या लोकांनी उध्दस्त केले. मी न्यायासाठी रोज प्रशासनाच्या दारात जाते. सोबत लेकरांना घेवून जाते, तरीही या निर्दयी लोकांना मायेचा पाझर फुटत नाही. गरीबांसाठी न्याय असतो का नाही, हेच कळायला तयार नाही. रोज पोलीस ठाण्यात जाताना लेकरांची शाळा बुडत आहे. अशावेळी माझ्या मनाला प्रचंड वेदना होतात. –ज्ञानेश्वरी मुंडे.

### अन् खा.सोनवणेंनी पुसले डोळे

उपचार घेत असलेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेवून खा.सोनवणे हे बाहेर पडत असताना ज्ञानेश्वर मुंडे यांच्या आईचीही सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी मुंडेच्या आईंनी हंबरडा फोडला. माझ्या लेकरांना न्याय द्या, पोलीस काहीच करत नाहीत, असे म्हटले. यावेळी आईचा हंबरडा पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले होते. दरम्यान, सोनवणे यांनी त्यांचे अश्रू पूसत मी तूमच्या सोबत आहे. खचून जावू नका, असा विश्वास दिला.

# पत्रकारांच्या एस.टी.प्रवास सवलतीत सुधारणा होणार–परिवहन मंत्री सरनाईक

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (रा.प.महामंडळ) बसेस मधून प्रवास करणाऱ्या अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना दिल्या जाणाऱ्या सवलतीत लवकरच सुधारणा केली जाणार आहे. तसेच काही नवीन सवलती देखील लागू करण्याचा प्रस्तावही शासन पातळीवर विचाराधीन असून, याबाबत लवकरच निर्णय होणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.विधान भवनात मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पदाधिकाऱ्यां सोबत अधीस्वीकृती धारक पत्रकारांच्या एसटी बस प्रवासाच्या सवलतींच्या मुद्यावर गुरुवारी बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत ते बोलत होते.यावेळी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे,सरचिटणीस दीपक भातुसे, खजिनदार विनोद यादव,कार्यकारिणीचे सदस्य प्रशांत बारसिंग आदी पदाधिकारी उपस्थित होते. सद्यस्थितीत अधिस्वीकृती धारक पत्रकारांना साध्या, निमआराम व शिवशाही (आसनी/शयनयान) बस प्रकारामध्ये १०० टक्के प्रवास भाड्याची सवलत मिळते.मात्र,या सवलतीवर ८,००० किलोमीटरची मर्यादा आहे.ही मर्यादा रद्द करण्याची मागणी वारंवार होत असून,ती मंजूर करण्या बाबत सकारात्मक विचार सुरू असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.तसेच पत्रकारांना एसटीच्या सर्व बसेस मधून मोफत प्रवास करण्याची सवलत अनुज्ञेय करावी अशी मागणी मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या कार्यकारिणी सोबत झालेल्या बैठकीत करण्यात आली होती.त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले असल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.या मागणी बाबत सकारात्मक प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल,असेही त्यांनी स्पष्ट केले.पत्रकारांना एसटी प्रवासासाठी सद्या ऑनलाइन आरक्षण करण्याची सुविधा उपलब्ध नाही. येत्या १५ ऑगस्टपासून ऑनलाइन सीट आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अधिस्वीकृती धारक पत्रकारांना पुढील महिन्यापासून घरबसल्या एसटी बस मधून प्रवास करण्या साठी सीट आरक्षित करता येईल.या निर्णयां मुळे पत्रकारांना काम करताना अधिक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे सांगत मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री सरनाईक यांचे आभार मानले.



# कुडाळ-मालवण मुख्य रस्त्याची दयनीय अवस्था;खड्ड्यांमुळे अपघातांचे वाढते धोके

## कुडाळ–मालवणचे आमदार निलेश राणे लक्ष देणार का?

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी**

कुडाळ आणि मालवण या दोन तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा कुडाळ–नेरुरपार–काळसे–धामापूर–मालवण हा रस्ता सध्या खड्ड्यांनी भरून गेला असून वाहनचालकांसाठी तो मृत्यूचा सापळा ठरत आहे. विशेषत: नेरुरपार पूल ते काळसे–धामापूर या भागातील मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात या रस्त्यावर खड्डे पडतात. पण सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) फक्त तात्पुरती मलमपट्टी करून वेळ मारून नेत असल्याने यंदाही तीच स्थिती पाहायला मिळत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.


**प्रशासनाचे दुर्लक्ष अपघातांचे प्रमाण वाढतेय!**

गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याची अवस्था अशीच आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे माहिती असूनही कोणतीही कायमस्वरूपी दुरुस्ती केली जात नाही. खड्ड्यांमुळे केवळ वाहनांचे नुकसान होत नाही, तर गंभीर अपघातांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे.

कोणतीही मोठी दुर्घटना घडल्यास याची पूर्ण जबाबदारी झथऊ आणि जिल्हा प्रशासनाची असेल, असं ठाम मत नागरिक मांडत आहेत.

**जनतेतून संतप्त प्रतिक्रिया – 'आमदारांनी लक्ष द्यावे!'**प्रशासन लोकांच्या जीवाशी खेळतेय का? असा थेट सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. केवळ तात्पुरत्या डागडुजीवर न थांबता, रस्ता खड्डेमुक्त करणे आणि कायमस्वरूपी दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे.

आमदार निलेश राणे यांच्याकडून या मार्गाकडे तातडीने लक्ष दिले जावे, अशी जनतेतून मागणी होऊ लागली आहे. अन्यथा उद्भवणाऱ्या दुर्घटनांबद्दल प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनाच जबाबदार धरले जाईल, असा इशारा नागरिक देत आहेत.



# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात चला घडवू या विकसित महाराष्ट्र समारोप कार्यक्रम संपन्न



**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालयात चला घडवू या विकसित महाराष्ट्र २०४७ जाणिव जागृती कार्यक्रमाचा दि.१७ जुलै २०२५रोजी पोस्टर प्रदर्शन या जाणीव जागृती कार्यक्रमाने समारोप करण्यात आला.दि.

१८ जुन ते १७ जुलै २०२५ चला घडवू या विकसित महाराष्ट्र २०४७ महाराष्ट्राचे व्हिजन अधूमेंट्स, नियोजन विभाग, महाराष्ट्रशासन नागरिक सव्हेक्षण कालावधी दि. १८ जुन ते १७ जुलै २०२५ अंतर्गत पोस्टर प्रदर्शन,माहिती व जनजागृती कार्यशाळा घेवून या आनलाईन सव्हेक्षणाची जाणीव जागृती गावात करण्यात आली. गावातील बऱ्याच लोकांनी या आनलाईन सर्वेक्षणात भाग घेवून माहिती आनलाईन केली व अभिप्राय ही दिले.स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज.जि.बीड यांच्या सौजन्याने ही जनजागृती करण्यात आली.या कालावधीत वाचक,युवक,विद्यार्थी, जेष्ठ नागरिक यांनी सहभाग घेतला. अभिप्राय देणाऱ्या मध्ये प्रामुख्याने ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड,माजीसरपंच ज्ञानेश्वर माऊली गायकवाड,माजी उप सरपंच बालासाहेब गायकवाड,रविंद्र गायकवाड पेन्टर, बाळासाहेब गायकवाड, पांडूरंग गायकवाड, रावसाहेब गायकवाड, ग्रंथालयाचे आनंदभैय्या गायकवाड यांच्यासह अनेकांनी ग्रंथालयाच्या अभिप्राय रजिस्टर मध्ये अभिप्राय लिहिले, वैजनाथ गायकवाड, मंचक वैरागे, बालासाहेब वैरागे, ह.भ.प.नारायण गायकवाड,प्रतिक्षा चौरे, अश्विनी वैरागे,लक्ष्मी वैरागे,रामराव गायकवाड,प्रभू गायकवाड यांच्यासह अनेकांनी सक्रीय सहभाग घेतला.

# नवरा बाजाराला जाताच दोन मुलाच्या आई बेपत्ता

**केज । गौतम बचुटे**

नवरा भाजीपाला विक्री करण्यासाठी बाहेरगावी जाताच दोन मुलांची आई असलेली एक २६ वर्षाची महिला केज शहरातून बेपत्ता होण्याची खळबळजनक घटना घडली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील एक कुटुंब हे केज शहरात राहत असून ते कुटुंब भाजीपाला आणि माळव्याची विक्री करून त्यांच्या कुटुंबाची उपजीविका भागवतात. त्यांना एक मुलगा व एक मुलगी असे दोन अपत्ये आहेत. दि. १६ जुलै रोजी सदर महिलेचा नवरा हा केज तालुक्यातील तर लव्हुरी येथील आठवडी बाजारात भाजीपाला विक्री करण्यासाठी गेला होता. दुपारी ४:०० वाजता त्यांना लिंबाचीवाडी येथील त्यांच्या मावसभावाने कळविले की, त्याच्या बायकोने फोन करून पैसे मागितले होते.

दरम्यान रात्री घरी आल्या नंतर भाजीपाला विक्रे त्याने त्याच्या बायकोची चौकशी केली असता ती आढळून आली नाही. तिचा मोबाईल देखील घरीच होता.

या प्रकरणी महिलेच्या नवऱ्याच्या तक्रारी वरून ती हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

बेपत्ता झालेल्या महिलेची उंची ५ फुट, रंग सावळा, बांधा मध्यम, अंगात मेहंदी रंगाची साडी, केस लांब काळे, गळ्यात बेनटेक्सचे मंगळसुत्र, कानात सोन्याचे रिंग आहे. सदर महिला कोणाला आढळून आल्यास जवळच्या पोलिस ठाण्या किंवा केज पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे आणि तपासी पोलिस हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपने यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांची भेट घेऊन त्यांचे राजेभाऊ फड यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेक सहकारी मित्र उपस्थित होते.**

# पिडीत पारधी समाजाला न्याय द्या वंचित बहुजन आघाडीची मागणी

**बीड । प्रतिनीधी**

पाटोदा तालुक्यातील आदिवासी पारधी कुटुंबावर झालेल्या अन्यायासंदर्भात वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. अरुण जाधव यांच्या नेतृत्वाखाली पिडीत कुटुंबाला भेट देऊन सांत्वन केले.

वंचित बहुजन आघाडी तुमच्या सोबत आहे असे आश्वासित केले. त्यानंतर पाटोदाचे मा. तहसीलदार साहेबांना भेटून यावर सविस्तर वंचित बहुजन आघाडीची भूमिका मांडली दरम्यान पीडित कुटुंब सोबत होते . पीडित कुटुंबाला न्याय द्या असे मागणी केली त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अरुण जाधव, तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, दीपक थोरात, गणेश पवळ,आप्पासाहेब देवडे, बळीराम ससाने यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077